आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक ०७ डिसेंबर २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. नागपूरमधे उद्यापासून सुरू होणाऱ्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वतयारीचा विधानपरिषदेच्या सभापतींकडून आढावा; विरोधकांचा आजच्या चहापानावर बहिष्कार.

2. 'हिंद की चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शहिदी शताब्दी समारोहानिमित्त नागपूर इथं आयोजित कार्यक्रमात लाखो भाविकांची उपस्थिती.

3. गोव्यात नाईट क्लबमध्ये लागलेल्या आगीमुळे मरण पावलेल्यांची संख्या २५ वर.

4. विदर्भ गारठला; गोंदिया इथं आठ पूर्णांक दोन दशांश अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद.

<u>हिवाळी अधिवेशन</u>

राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून नागपूर इथं सुरू होत आहे. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी अधिवेशनाच्या तयारीचा आढावा घेतला. अत्यावश्यक सुविधा, निवारा,पार्किंग, सुरक्षा व्यवस्था वायफाय, टपाल तसंच आहार याबाबत प्रशासनानं उत्तम पद्धतीनं नियोजन केलं असल्याचं त्यांनी नागपूर इथं वार्ताहर परिषदेत सांगितलं. विधिमंडळ परिसरात अनावश्यक गर्दी होणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत, त्याचप्रमाणे मुंबईहून अधिवेशनासाठी येणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी दोन विशेष रेल्वेगाड्यांची व्यवस्था करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. या वार्ताहर परिषदेला विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे देखील उपस्थित होत्या. महाराष्ट्र विधान मंडळामध्ये दोन्हीही सभागृहात विरोधी नेते पदाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याचं वार्ताहरांच्या प्रश्नाला उत्तर देताना शिंदे यांनी सांगितलं. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आज संध्याकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी त्यांच्या रामगिरी निवासस्थानी विधीमंडळ सदस्यांना चहापानासाठी आमंत्रित केलं आहे. मात्र विरोधी पक्षांनी सत्ताधाऱ्यांच्या चहापानावर बहिष्कार टाकल्याचं काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी नागपूर इथं वार्ताहर परिषदेत सांगितलं. दोन्ही सभागृहातलं विरोधी पक्षनेते पद रिक्त ठेवण्यात आलं आहे. ही दोन्हीही संविधानिक पदं रिक्त असल्यामुळे सरकारचा संविधानावर अविश्वास असल्याचा संशय निर्माण होतो. त्यामुळे आम्ही चहापानावर बहिष्कार टाकला असल्याचं विजय वडेट्टीवार म्हणाले.......

*1985 मध्ये भारतीय जनता पक्षामध्ये 16 आमदार होते तरी पण त्यावेळेस विरोधी पक्षनेते पद दिल गेलं होत. आणि कधीही काँग्रेसनी फक्त आम्ही सत्ताधारी म्हणून ते संविधानिक पद रिक्त ठेवलं नाही, पण विरोधकांची भीती वाटते कि काय  किंवा सरकारला मनमानी कारभार करायचा आहे. वाटेल त्या पद्धतीने काम करायचा आहे. त्यामुळे ही दोन्ही पदे रिक्त ठेवून जर चहापाण्याला बोलवतात असतील तर त्यावर बहिष्कारच टाकन बरं ते समजून आम्ही निर्णय घेतला आहे.*

देशात होणाऱ्या शेतकरी आत्महत्या पैकी ३८ पूर्णांक ५ % आत्महत्या एकट्या महाराष्ट्रात होत असल्याचं वडेट्टीवार म्हणाले. राज्यावर नऊ लाख 32 हजार कोटींचं कर्ज असून राज्याची आर्थिक स्थिती पूर्णतः बिघडली आहे. विदर्भातील तरुण नोकरीसाठी बाहेर पलायन करत आहेत, भ्रष्टाचार फोफावला आहे, अल्पवयीन मुलींवरील अत्याचारात महाराष्ट्र देशात क्रमांक एकवर असून राज्यातल्या जमिनी कवडीमोल भावान उद्योजकांना देण्यात येत असल्याची टीका विजय वडेटीवारांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली. यावेळी महाविकास आघाडीतील अनेक नेते उपस्थित होते.

हिंद दि चादर

आपल्या बलिदानातून धर्माचे जपलेले तत्व आणि  मानवतेसाठी धर्माप्रती स्विकारलेली निष्ठा याचा मूलमंत्र देणारे हिंद की चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शहिदी शताब्दी समारोहानिमित्त नागपूर येथे आयोजित मोह्त्सवात देशभरातून  सुमारे 5 लाख भाविक जमले आहेत.  गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या  साडेतिनशेव्या शहिदी समागम शताब्दी वर्षाचं औचित्यसाधून नागपूरच्या नारा भागातील डॉ. सुरेशचंद्र सुरी मैदानात 'हिंद दी चादर' या  कार्यक्रमाच पहिल्यांदाच आयोजन करण्यात आल आहे. या धार्मिक-सांस्कृतिक सोहळयासाठी  मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित आहेत. गुरु तेगबहादुर यांनी  संपूर्ण मानवतेसाठी, सत्य, आणि धर्मासाठी संघर्ष केला असे गौरवोद्गार गडकरी यांनी आपल्या संबोधनातून काढले.

*गुरु तेग बहादुर जी ने अपने जीवन में संपूर्ण मानवता के लिए, सत्य के लिए और हमारे धर्म की रक्षा करने के लिए बहुत बड़ा संघर्ष किया। मानवता के प्रति उनकी कटिबद्धता, साहस, करुणा और धर्म के परम रक्षक के रूप में हम उनको याद करते हैं और मुझे खुशी है कि गुरु तेग बहादुर साहिब जीके साथ जो-जो लोगों की श्रद्धा है उन सब लोगों को इकट्ठा करके उनका एक भव्य समागम आज 350 वीं शहीदी दिन के रूप में हमारे बीच में नागपुर में बहुत उत्साह के साथ मनाया जा रहा है।*

ई-चलन प्रकरण

राज्यभरात येत्या १३ डिसेंबरला होणाऱ्या लोक अदालतीमध्ये ई-चलन प्रकरणांची तडजोड स्विकारली जाणार नसल्याचं मुंबई वाहतूक अपर पोलीस महासंचालक कार्यालयानं सांगितलं आहे. याबाबत नागरिकांनी अफवांना बळी पडू नये असं आवाहन करण्यात आलं आहे. आगामी लोक अदालतीत ई-चलन दंडात सवलत मिळणार असल्याची चुकीची माहिती समाज माध्यमांवर पसरवली जात असल्याचं निदर्शनास आलं असून नागरिकांची आर्थिक फसवणूक होण्याची शक्यता असल्यान पोलीस विभागानं नागरिकांना सतर्कतेचं आवाहन केलं आहे.

मेळघाट

माता आणि बालमृत्यू रोखण्यासाठी आवश्यक सुविधांच्या निर्मिती सोबतच, नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे. त्यामुळे आरोग्य यंत्रणा बळकटीकरणाची सुरुवात गाव पातळीवरून होण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अस प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक यांनी केल. मुंबई उच्च न्यायालयातील याचिकेच्या अनुषंगान देण्यात आलेल्या निर्देशानुसार विविध यंत्रणांनी मेळघाट भागाचा दौरा केला. यानिमित्तान याचिका कर्त्यांसोबत जिल्हाधिकारी कार्यालयात आज बैठक घेण्यात आली. या दौऱ्यातील निरीक्षणे १८ डिसेंबर रोजी मुंबई उच्च न्यायालयात सादर केली जाणार आहेत. याच दिवशी मेळघाट संबंधी याचिकेची सुनावणीही होणार आहे.

नाईट क्लब आग

गोव्यात आरपोरा इथल्या एका नाईट क्लबमध्ये काल रात्री लागलेल्या आगीमुळे मरण पावलेल्यांची संख्या २५ वर पोहोचली आहे. मृतांमध्ये चार पर्यटकांसह बहुतांश क्लबच्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. ही आग गॅस सिलिंडर स्फोटामुळे लागल्याचा अंदाज स्थानिक अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. या क्लबमध्ये अग्निसुरक्षा नियमांचं पालन केलं गेलं नसल्याचंही वृत्त आहे. आग लागलेल्या ठिकाणावरून सर्व मृतदेह बाहेर काढले असून, पोलीस पुढचा तपास करत आहे, त्यानंतरच पुढची कारवाई केली जाईल असं गोव्याचे पोलीस महासंचालक आलोक कुमार यांनी सांगितलं. या क्लबला योग्य तपासणी न करता परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांसह, प्रत्येक जबाबदार व्यक्ती विरोधात कठोर कारवाई केली जाईल, असं गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी म्हटलं आहे. दरम्यान राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, प्रधानमंत्री, गृहमंत्री आणि संरक्षण मंत्र्यांसह अनेकांनी या दुर्घटनेतील जीवित हानीबद्दल शोक व्यक्त केला आहे.

इंडिगो

इंडिगो विमानांच्या उड्डाणांमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर आज मुंबई आणि दिल्ली विमान तळावरून २२० पेक्षा जास्त उड्डाणं रद्द केली आहेत. मात्र, लवकरच आपली सेवा पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू असून पंधराशेहून जास्त उड्डाणं चालवण्याचं आश्वासन इंडिगोन आपल्या निवेदनात दिलं आहे. इंडिगो विमान कंपनीन आपल्या रद्द केलेल्या किंवा व्यत्यय आलेल्या विमानांमुळे नुकसान झालेल्या सर्व प्रवाशांचे पैसे आज रात्री आठ वाजेपर्यंत परत करावेत, असे निर्देश सरकारन दिले आहेत.

इंडिगो एअरलाइन्स

दरम्यान इंडिगोने FDTL म्हणजे ' फ्लाइट ड्युटी टाइम लिमिट' मधील बदल गांभीर्यान घेतले नाहीत, ज्यामुळे अलिकडच्या काळात देशभरात गोंधळ निर्माण झाला असल्याचं नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी माध्यमांना सांगितल. मंत्रालयान सर्व विमान कंपन्यांना १ जुलै २०२५ आणि १ नोव्हेंबर २०२५ रोजी दोन टप्प्यात न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार FDTL लागू करण्याचे निर्देश दिले होते. इंडिगोन हे गांभीर्यान न घेतल्यामुळे हे संपूर्ण संकट निर्माण झाल असल्याचं मोहोळ म्हणाले. परिस्थिती बिघडल्यानंतर मंत्रालय आणि नागरी विमान वाहतूक महासंचालक यांनी लगेचच कारवाई सुरू केली असून चार सदस्यांची चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे. या व्यतिरिक्त, दररोज संपूर्ण वेळ नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे हवाई सेवा लवकरात लवकर सुरू करता याव्यात यासाठी FDTL लागू करण्याचा आदेश फेब्रुवारी २०२६ पर्यंत पुढे ढकलण्यात आला असल्याची माहिती मोहोळ यांनी दिली.

विशष रेल्वे

गेल्या काही दिवसांपासून विमान उड्डाणांवर झालेल्या परिणामामुळे भारतीय रेल्वे सेवेन आपल्या विविध विभागांमध्ये पुढच्या दोन दिवसांसाठी ८९ विशेष रेल्वे गाड्या सोडण्याची घोषणा केली आहे. मध्य रेल्वे विभागात पुणे ते बेंगळुरू, पुणे ते दिल्ली आणि मुंबई ते दिल्ली यासह विविध मार्गांवर १४ विशेष गाड्या, पश्चिम रेल्वे विभागात भिवानी ते मुंबई आणि मुंबई ते शकुरबस्ती अशा विविध मार्गांवर ७ विशेष गाड्या सोडण्यात येणार आहेत.

## हवामान

हवामान! राज्यात तापमानात लक्षणीय घट झाली असून सर्वत्र थंडी वाढली आहे. विदर्भात आज सर्वात कमी किमान तापमान गोंदिया इथं आठ पूर्णांक दोन दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. त्या पाठोपाठ नागपूर इथं आठ पूर्णांक पाच, अमरावती इथं 9 पूर्णांक 8 तर, भंडारा इथं दहा अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. वाशिम, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली तसंच अकोला इथं किमान तापमान 11 ते 12 अंश सेल्सिअस दरम्यान आहे. सर्वाधिक कमाल तापमान अमरावती इथं 30 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. आज सर्वत्र कोरडं हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागान वर्तवला आहे.

****